कर आकारणी कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक - १२/०२/२०२६

## <u>प्रेस नोट</u>

## "पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अभय योजनेचे अखेरचे दोन दिवस असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेणेबाबत"

पुणे महानगरपालिका, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत कार्यक्षेत्रात "अभय योजना" राबविण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत थकीत कराचे व्याजाच्या रक्कमेवर ७५% सवलत देण्यात येत आहे. अभय योजना प्रथम दि. १५ नोव्हेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत राबविण्यात आली होती. तदनंतर दि. १६ जानेवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीसाठी योजनेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

अभय योजना २०२५-२६ चे दि. १४ फेब्रुवारी २०२६ व दि. १५ फेब्रुवारी २०२६ हे अखेरचे दोन दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त मिळकतकर थकबाकीदार यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा. कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत यापुढे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण ८ करधान नियम ४२ नुसार मिळकतीची अटकवणीची कारवाई करण्यात आली आहे. आजमितीस १८८ मिळकती सील करण्यात आलेल्या असून थकबाकीदार यांनी अभय योजनेचा लाभ घेऊन मिळकतकराचा भरणा करावा असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेचे नागरी सुविधा केंद्र शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ व रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८ वा. पर्यंत चालू ठेवण्यात येत आहेत.

अभय योजनेचे अखेरचे दोन दिवस असल्याने जास्तीत जास्त थकबाकीदारांनी स्वयंस्फूर्तीने थकीत कर भरून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

12.2.26

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका